# Philosophy

## Paper II

# दर्शनशास्त्र

## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each carrying **Two (2)** marks. Attempt *All* of them.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

---

1. Which one of the following is *not* accepted by Vivekanand ?

   (A) *Māyā* is the power of the creator

   *Māyā*

   (B) is the principle of change

   (C) is the power that creates illusion

   (D) is a *sakti* that makes creation possible

1. विवेकानंद यांना स्वीकृत नसलेले मत म्हणजे काय ?

   (A) माया म्हणजे निर्मात्याची शक्ती

   (B) माया म्हणजे परिवर्तनाचे तत्त्व

   (C) माया म्हणजे अशी शक्ती जी भ्रमाची निर्मिती करते

   (D) माया अशी शक्ती आहे जिच्या मुळे निर्मिती शक्य होते

2. According to B. R. Ambedkar his philosophy is enshrined in :

   (A) distribution justice

   (B) liberty, equality and fraternity

   (C) reservation for the economically backward class

   (D) upliftment of the shudras

2. बी. आर. आंबेडकरांच्या मते त्यांचे तत्त्वज्ञान या तत्त्वातून व्यक्त होते :

   (A) वितरणात्मक न्याय

   (B) स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

   (C) आर्थिक मागासवर्गासाठी आरक्षण

   (D) शूद्रांची उन्नती

3. According to K. C. Bhattacharyya, philosophical thought is :

(A) judgemental

(B) a matter of faith

(C) necessity speakable

(D) necessity non-speakable

4. The following theory of causation was accepted by :

(A)

(B) *Parināmavāda*

(C)

(D)

5. Vedas consist of :

(A) *Pramānas* and

(B) and

(C) and

(D) and

6. God, nature, soul and universe are all convertible terms, according to :

(A) Vivekanand

(B) Iqbal

(C) S. Radhakrishnan

(D) K. C. Bhattacharyya

3. के. सी. भट्टाचार्य यांच्या मतानुसार, तत्त्वज्ञानात्मक चिंतन असे असते :

(A) निर्णयात्मक

(B) आस्थेचा विषय

(C) अनिवार्यत: उच्चारणीय

(D) अनिवार्यत: अनुच्चारणीय

4. रामानुजांनी खालील कार्यकारणविषयक उपपत्ती स्वीकारली होती :

(A) आरंभवाद

(B) परिणामवाद

(C) विवर्तवाद

(D) प्रतीत्यसमुत्पाद

5. वेद या घटकांचे बनले आहेत :

(A) प्रमाणे व प्रमेये

(B) मन्त्र आणि ब्राह्मण

(C) सामान्य आणि विशेष

(D) संसार आणि निर्वाण

6. ईश्वर, प्रकृति, आत्मन् आणि विश्व ही यांच्या मतानुसार परस्परांतरणीय पदे आहेत :

(A) विवेकानंद

(B) इकबाल

(C) एस. राधाकृष्णन्

(D) के. सी. भट्टाचार्य

7. According to Advaita the dream objects belong to :

(A)

(B)

(C)

(D)

7. अद्वैतवेदांतानुसार स्वप्नातील विषयांना लागू होते :

(A) पारमार्थिक सत्ता

(B) व्यावहारिक सत्ता

(C) प्रातिभासिक सत्ता

(D) असत्ता

8. According to Aurobindo's theory of evolution, creation is an integration of :

(A) descent and ascent

[illegible]

(B) good and evil

(C) truth and falsehood

(D) and

8. अरविन्दांच्या उत्क्रांति-सिद्धान्तानुसार, सृजन हे यांचे समन्वयन आहे :

(A) अवरोहण आणि आरोहण

(B) शुभ आणि अशुभ

(C) सत्यत्व आणि असत्यत्व

(D) धर्म आणि अधर्म

9. , in Vaisesika philosophy, means :

(A) whatever cannot be known

(B)

(C) *dharma* and *adharma*

(D) *daiva*

9. वैशेषिक तत्त्वज्ञानानुसार अदृष्ट म्हणजे :

(A) ज्याचे ज्ञान होऊ शकत नाही

(B) ईश्वर

(C) धर्म आणि अधर्म

(D) दैव

10. Which of the following is *not* accepted in Advaita Vedānta ?

(A)

(B)

(C)

(D)

11. According to , the source of our knowledge of *dharma* is :

(A) *pratyaksa*, *anumāna* and *sruti*

(B) and *sruti*

(C) *sruti* alone

(D) *sruti*, *smrtis* and

12. The following feature is *not* attributed to in Patañjali's Yoga :

(A) Creator of the world

(B) Special kind of *Purusa*

(C) The teacher of teachers

(D) Omniscient

10. अद्वैतवेदांतात खालीलपैकी कशाचा स्वीकार केलेला नाही ?

(A) ब्रह्मात्मैक्य

(B) माया

(C) पुरुषबहुत्व

(D) ब्रह्मविवर्तवाद

11. मीमांसेनुसार आपल्याला धर्मज्ञान होण्याला आधारभूत आहेत :

(A) प्रत्यक्ष, अनुमान आणि श्रुती

(B) अनुमान आणि श्रुती

(C) फक्त श्रुती

(D) श्रुती, स्मृती आणि पुराणे

12. पतंजलींच्या योगदर्शनात ईश्वराला खालील गुणधर्म लागू केलेला **नाही** :

(A) विश्वनिर्माता

(B) पुरुषविशेष

(C) गुरूंचा गुरू

(D) सर्वज्ञ

13. The following metaphor was *not* used by *Sāmkhyas* for explaining the relation between *Prakrti* and *Purusa* :

(A) Milk and calf

(B) Dancer and audience

(C) The earth and the sun

(D) A blind person and a lame person

14. Which of the following , according to *Vaisesika*, is and ?

[illegible]

(A)

(B)

(C)

(D)

15. , according to Vaisesika, is :

(A)

(B)

(C) *avyakta*

(D) *nitya*

13. प्रकृती आणि पुरुष यांतील संबंधाचे स्पष्टीकरण करताना सांख्यांनी पुढील रूपकाचा वापर केलेला **नाही** :

(A) दूध आणि वासरू

(B) नर्तिका आणि प्रेक्षक

(C) पृथ्वी आणि सूर्य

(D) आंधळा माणूस व पांगळा माणूस

14. वैशेषिकांच्या मते खालीलपैकी कोणता अभाव अनादि आणि सान्त असतो ?

(A) संसर्गाभाव

(B) अन्योन्याभाव

(C) प्रागभाव

(D) ध्वंसाभाव

15. वैशेषिकांच्या मते समवाय असतो :

(A) अमूर्त

(B) अयुतसिद्ध

(C) अव्यक्त

(D) नित्य

16. , in *Nyāya* , stands for the relation between :
    - (A) words
    - (B) word and object
    - (C) word and Speaker's intention
    - (D) word and its etymology

17. Which of the following is regarded as in ?
    - (A)
    - (B)
    - (C)
    - (D)

18. Which of the following is treated as in ?
    - (A)
    - (B)
    - (C)
    - (D) *Smrti*

19. According to School of Buddhism :
    - (A) External objects can be known through yogic perception
    - (B) External objects can be inferred
    - (C) External objects do not exist
    - (D) There are no objects at all

16. न्यायदर्शनानुसार आकांक्षा हा खालील गोष्टींमधील संबंध असतो :
    - (A) शब्द
    - (B) शब्द आणि विषय
    - (C) शब्द आणि वक्त्याचा अभिप्राय
    - (D) शब्द आणि त्याची व्युत्पत्ती

17. न्यायदर्शनात खालीलपैकी कोणता हेत्वाभास मानला आहे ?
    - (A) पक्षधर्मता
    - (B) सत्प्रतिपक्ष
    - (C) परामर्श
    - (D) उपाधिनिरास

18. न्यायदर्शनात खालीलपैकी कशाला अप्रमा मानले आहे ?
    - (A) प्रत्यक्ष
    - (B) उपमान
    - (C) शब्द
    - (D) स्मृति

19. बौद्धदर्शनाच्या योगाचार संप्रदायानुसार :
    - (A) बाह्यार्थांचे ज्ञान यौगिक प्रत्यक्षाद्वारे होऊ शकते
    - (B) बाह्यार्थांचे अनुमान करता येते
    - (C) बाह्यार्थ अस्तित्वात नसतात
    - (D) कोणतेच विषय अस्तित्वात नाहीत

20. school identifies with :

(A)

(B)

(C)

(D)

21. The state of can be described as the state of (choose from the code given below) :

**Code :**

Madhyamika *Pratipat*

(*i*) Cessation of suffering

(*ii*) Eternal Bliss

(*iii*) Annihilation

(*iv*) Self-realisation

(*v*) Cessation of craving

(A) (*i*) and (*ii*)

(B) (*ii*) and (*iii*)

(C) (*i*) and (*iv*)

(D) (*i*) and (*v*)

20. ‘शून्यता’ ही खालील गोष्टीशी एकरूप असल्याचे माध्यमिक संप्रदाय सांगतो :

(A) मध्यमा प्रतिपत्

(B) निर्वाण

(C) संसार

(D) स्वभाव

21. ‘निर्वाण’ ह्या अवस्थेचे वर्णन खालील अवस्थेच्या आधारे करता येईल. (खाली दिलेल्या कोष्टकातून निवड करावी) :

**कोष्टक :**

(*i*) दु:खनिरास

(*ii*) शाश्वत आनंद

(*iii*) नि:शेष नाश

(*iv*) आत्मसाक्षात्कार

(*v*) तृष्णानिरास

(A) (*i*) व (*ii*)

(B) (*ii*) व (*iii*)

(C) (*i*) व (*iv*)

(D) (*i*) व (*v*)

22. Which of the following are the types of direct knowledge in the strict sense according to Jainism ? Choose from the code below :

**Code :**

(*i*) *Mati*

(*ii*) *Sruta*

(*iii*) *Avadhi*

(*iv*)

(*v*) *Kevala*

(A) Only (*v*)

(B) Only (*iv*) and (*v*)

(C) Only (*iii*), (*iv*) and (*v*)

(D) (*i*), (*iii*), (*iv*) and (*v*)

23. do not accept *dharma* as because :

(A) They are against theory as such

(B) *Dharma* is concerned with duties and obligations

(C) *Dharma* is concerned with otherworldly results of actions

(D) Ultimately one has to transcend *dharma* for the sake of *Moksa*

22. खालीलपैकी कोणत्या प्रकारचे ज्ञान जैनदर्शनानुसार काटेकोर अर्थाने प्रत्यक्षज्ञान आहे ? खालील कोष्टकातून निवड करा :

**कोष्टक :**

(*i*) मति

(*ii*) श्रुत

(*iii*) अवधि

(*iv*) मन:पर्याय

(*v*) केवल

(A) फक्त (*v*)

(B) फक्त (*iv*) व (*v*)

(C) फक्त (*iii*), (*iv*) व (*v*)

(D) (*i*), (*iii*), (*iv*) व (*v*)

23. चार्वाक धर्माचा पुरुषार्थ म्हणून स्वीकार करत नाहीत कारण :

(A) ते एकूणच पुरुषार्थ सिद्धांताच्या विरुद्ध आहेत

(B) धर्म हा कर्तव्ये व बंधने यांच्याशी संबंधित असतो

(C) धर्म हा कर्मांच्या पारलौकिक परिणामांशी संबंधित असतो

(D) अंतिमत: मोक्षासाठी धर्माच्या पलिकडे जावे लागते

24. ‘ ’ in the Vedic context refers to :

(A) Vedas, Upanisads and *Vedānta*

(B) Upanisad, and *Vedānta*

(C) Rk, and Yajus

(D) Indra, Agni and

25. The Upanisadic statement ‘thou art that’ speaks of the identity of :

(A) Matter and spirit

*Bhagavadgita*

(B) Individual self and the Absolute

(C) *Brahman* and

(D) Knowledge and action

26. Which *one* of the following is *not* correctly matched :

**Author** **Text**

(A) Gilbert Ryle — *The Concept of Mind*

(B) J. P. Sartre — *Being and Nothingness*

(C) Rene Descartes — *Cartesian Meditation*

(D) Edmund Husserl — *Ideas*

24. वैदिक संदर्भात ‘त्रयी’ म्हणजे :

(A) वेद, उपनिषदे आणि वेदांतसूत्रे

(B) उपनिषदे, भगवद्‌गीता आणि वेदान्तसूत्रे

(C) ऋक्, साम आणि यजुस्

(D) इंद्र, अग्नि आणि वायु

25. ‘तू ते आहेस’ या औपनिषदिक वाक्यातून पुढील दोघांमधील ऐक्य सांगितले आहे :

(A) जडतत्त्व आणि आत्मा

(B) व्यक्तिगत आत्मा आणि निरुपाधिक तत्त्व

(C) ब्रह्म आणि ईश्वर

(D) ज्ञान आणि कर्म

26. खालीलपैकी कोणती जोडी बरोबर जुळत **नाही** ?

**लेखक** **ग्रंथ**

(A) गिल्बर्ट राईल – दि कन्सेप्ट ऑफ माइंड

(B) जे. पी. सार्त्र – बीइंग अँड नथिंगनेस

(C) रेने देकार्त – कार्टेशियन मेडिटेशन्स

(D) एडमंड हुसेर्ल – आयडियाज

 [P.T.O.

27. Nietzsche's 'will-to-power' is :
   (A) nihilistic
   (B) meaningless
   (C) logical
   (D) creative

28. For Spinoza, God is :
   (A) personal force
   (B) creative force
   (C) explanatory principle
   (D) teleological principle

29. Leibniz's monads are :
   (A) solid
   (B) interactive
   (C) self-sufficient
   (D) dependent

30. For Spinoza the mind and body are :
   (A) two independent substances
   (B) two dependent substances
   (C) two forms of one substance
   (D) two parallel substances

27. नीत्शेचा 'शक्ति-पर-संकल्प' हा आहे :
   (A) उच्छेदवादी
   (B) निरर्थक
   (C) तार्किक
   (D) सृजनशील

28. स्पिनोझाच्या मते ईश्वर हा आहे :
   (A) व्यक्तिगत सामर्थ्य
   (B) सृजनशील सामर्थ्य
   (C) स्पष्टीकरणात्मक तत्त्व
   (D) प्रयोजनात्मक तत्त्व

29. लायब्निझचे चिदणू आहेत :
   (A) घन
   (B) परस्परक्रियाकारी
   (C) स्वयंपूर्ण
   (D) अवलंबी

30. स्पिनोझाच्या मते मन आणि शरीर आहेत :
   (A) दोन स्वतंत्र द्रव्ये
   (B) दोन परतन्त्र द्रव्ये
   (C) एकाच द्रव्याचे दोन आकार
   (D) दोन समांतर द्रव्ये

31. The causal relation, according to Hume, is an :
    (A) associative idea
    (B) dissociative idea
    (C) innate idea
    (D) analytical idea

32. In Hegel the progress towards the Absolute is one of :
    (A) growth of false-consciousness
    (B) the process of alienation from world
    (C) the growth of self-consciousness
    (D) the state of self-alienation

33. According to Ryle, Cartesian theory of mind is based on a confusion between :
    (A) brain and mind
    (B) physical and mental properties
    (C) psychic and spiritual properties
    (D) mental descriptions and dispositions

31. ह्यूमच्या मते कार्यकारणसंबंध ही आहे :
    (A) साहचर्यमूलक कल्पना
    (B) वियोजनमूलक कल्पना
    (C) उपजत कल्पना
    (D) विश्लेषणात्मक कल्पना

32. हेगेलनुसार निरूपाधिक तत्त्वाच्या दिशेने प्रगती म्हणजे एक प्रकारे :
    (A) मिथ्याजाणिवेचा विकास असतो
    (B) जगापासून दुरावण्याची प्रक्रिया असते
    (C) स्व-जाणिवेचा विकास असतो
    (D) आत्मदुराव्याची स्थिती असते

33. राईलच्या मते देकार्तची मन-विषयक उपपत्ती पुढील दोघांमधील गोंधळावर आधारित असते :
    (A) मेंदू आणि मन
    (B) भौतिक आणि मानसिक गुणधर्म
    (C) मानसिक आणि आत्मिक गुणधर्म
    (D) मानसिक वर्णने आणि क्षमता

34. For Locke the basis of material objects is :
    (A) something known
    (B) something unknown
    (C) something imaginary
    (D) something illusory

35. For Kant cause is a category of :
    (A) quantity
    (B) quality
    (C) modality
    (D) relation

36. For Kant space and time are :
    (A) Ideas of reason
    (B) Categories of understanding
    (C) Forms of intuition
    (D) Analogies of experience

37. According to Wittgenstein a name can only be :
    (A) true
    (B) used with purpose
    (C) a referent
    (D) meaningful

34. लॉकच्या मते भौतिक विषयांचा आधार :
    (A) काहीतरी ज्ञात असतो
    (B) काहीतरी अज्ञात असतो
    (C) काहीतरी काल्पनिक असतो
    (D) काहीतरी आभासी असतो

35. कांटच्या मते कारण ही कोटी खालील प्रकारची असते :
    (A) परिमाण
    (B) गुणवत्ता
    (C) रीती
    (D) संबंध

36. कांटच्या मते अवकाश व काल या :
    (A) विवेकशक्तीच्या कल्पना आहेत
    (B) आकलनाच्या कोटी आहेत
    (C) अंत:प्रज्ञेचे आकार आहेत
    (D) अनुभवाची उपमाने आहेत

37. विटगेन्स्टाइनच्या मते नाम हे फक्त :
    (A) सत्य असू शकते
    (B) सहेतुकपणे वापरले जाऊ शकते
    (C) निर्देशक असू शकते
    (D) अर्थपूर्ण असू शकते

38. Moore's "Refutation of Idealism" challanges the view :
    - (A) common to all idealist theories
    - (B) that only true ideas are real
    - (C) that the external world is unknowable
    - (D) that the knowledge of the self is absolutely certain

39. Logic is the essence of philosophy according to Russell because of its :
    - (A) simplicity
    - (B) mathematical nature
    - (C) clarity
    - (D) generality

40. According to Gilbert Ryle a category mistake arises when :
    - (A) identical things are seen as different
    - (B) different things are seen as identical
    - (C) things of one kind are presented as if they belong to another
    - (D) things of different kinds are presented as seperate and distinct

38. मूरचे ''चैतन्यवादाचे खंडन'' याला आव्हान देते :
    - (A) सर्व चैतन्यवादी उपपत्तींना समान असलेला दृष्टिकोन
    - (B) फक्त कल्पना सत्य आहेत हा दृष्टिकोन
    - (C) बाह्य जग अज्ञेय आहे हा दृष्टिकोन
    - (D) आत्म्याचे ज्ञान हे पूर्णपणे निश्चित असते हा दृष्टिकोन

39. रसेलच्या मते तर्कशास्त्र हे तत्त्वज्ञानाचे सारतत्त्व आहे ते तर्कशास्त्राच्या :
    - (A) सरलतेमुळे
    - (B) गणिती स्वरूपामुळे
    - (C) विशदतेमुळे
    - (D) सर्वसाधारणतेमुळे

40. गिल्बर्ट राईलच्या मते कोटिप्रमाद त्यावेळी उद्भवतो, जेव्हा :
    - (A) एकरूप असलेल्या गोष्टींकडे 'वेगळ्या' म्हणून पाहिले जाते
    - (B) वेगळ्या गोष्टींकडे 'एकरूप' म्हणून पाहिले जाते
    - (C) एका प्रकारच्या गोष्टी जणू दुसऱ्या प्रकारच्या असल्याप्रमाणे सादर केल्या जातात
    - (D) वेगळ्या प्रकारच्या गोष्टी स्वतंत्र आणि पृथक असल्याप्रमाणे सादर केल्या जातात

41. According to C. S. Pierce truth is that which a process of enquiry would lead to if pursued to :

(A) an ideal limit

(B) a realistic limit

(C) a logical limit

(D) an empirial limit

42. Logical positivism is a movement which presupposes that there is a confirmation theory with a :

(A) unique authority

(B) contextual authority

(C) syntactic authority

(D) semantic authority

43. According to early Wittgenstein a sentence must share a pictorial form with :

(A) other sentences of the same genre

(B) its apparent content

(C) its ideal use

(D) the state of affairs it reports

41. सी. एस. पिअर्सच्या मते चौकशीची प्रक्रिया खालील मर्यादेपर्यंत पुढे नेली तर सत्याकडे घेऊन जाते :

(A) आदर्श मर्यादा

(B) वास्तवनिष्ठ मर्यादा

(C) तार्किक मर्यादा

(D) आनुभविक मर्यादा

42. तार्किक प्रत्यक्षतावाद या चळवळीत ही गोष्ट गृहीत धरलेली होती की सत्यापनाची अशी एक उपपत्ती आहे की जिचे प्रामाण्य :

(A) अद्वितीय स्वरूपाचे आहे

(B) संदर्भानुसारी आहे

(C) पदनिष्ठ आहे

(D) अर्थनिष्ठ आहे

43. पूर्वकालिक विटगेन्स्टाइनच्या मते वाक्याचा चित्रीय आकार पुढील गोष्टीशी जुळणारा असायला हवा :

(A) त्याच प्रकारच्या अन्य वाक्यांशी

(B) त्याच्या आभासी आशयाशी

(C) त्याच्या आदर्श प्रयोगाशी

(D) त्यातून सांगितल्या जाणाऱ्या वस्तुस्थितीशी

44. According to Husserl intentionality is a complex relation among :
   (A) subject and object
   (B) act and content
   (C) subject and content
   (D) subject, act, content and object

44. हुसेर्लच्या मते सविषयकता हा यांच्यामधील व्यामिश्र संबंध असतो :
   (A) विषयी व विषय
   (B) क्रिया व आशय
   (C) विषयी व आशय
   (D) विषयी, क्रिया, आशय आणि विषय

45. In investigating consciousness phenomenologically the existence of things in the world is :
   (A) suspended
   (B) assumed
   (C) doubted
   (D) affirmed

45. जाणिवेचा मानसघटनाशास्त्रीय शोध घेताना जगातील वस्तूंचे अस्तित्व :
   (A) निलंबित केले जाते
   (B) गृहीत धरले जाते
   (C) संशयित केले जाते
   (D) विहित केले जाते

46. According to Hegel history is :
   (A) empirical
   (B) spiritual
   (C) intellectual
   (D) dialectical

46. हेगेलच्या मते इतिहास हा असतो :
   (A) आनुभविक
   (B) आध्यात्मिक
   (C) बौद्धिक
   (D) द्वंद्वात्मक

47. *Episteme* differs from *doxa* as it is :
    - (A) justified true belief
    - (B) intuited true belief
    - (C) perceived true belief
    - (D) harmonised true belief

48. Democritus upheld that atoms are :
    - (A) mobile in empty space
    - (B) immobile in empty space
    - (C) suspended in empty space
    - (D) mobile in nonempty space

49. According to Aristotle, the subject matter of philosophy is the study of :
    - (A) movable things
    - (B) immovable things
    - (C) destructible things
    - (D) indestructible things

50. *Summa Theologia* was authored by :
    - (A) Aquinas
    - (B) Anselm
    - (C) Augustine
    - (D) Aristotle

47. 'एपिस्टेमे' ही 'डोक्सा' पासून वेगळी ठरते कारण ती असते :
    - (A) समर्थित सत्य विश्वास
    - (B) अंत: स्फूर्त सत्य विश्वास
    - (C) प्रत्यक्षीकृत सत्य विश्वास
    - (D) सुसंवादित सत्य विश्वास

48. डेमोक्रेटसने मत मांडले की परमाणू :
    - (A) रिक्त अवकाशात चल आहेत
    - (B) रिक्त अवकाशात अचल आहेत
    - (C) रिक्त अवकाशात स्थगित आहेत
    - (D) अरिक्त अवकाशात चल आहेत

49. ॲरिस्टॉटलच्या मते तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय खालील गोष्टीचा अभ्यास हा असतो :
    - (A) चल वस्तू
    - (B) अचल वस्तू
    - (C) विनाशी वस्तू
    - (D) अविनाशी वस्तू

50. 'सुम्मा थिओलॉजिया' चा लेखक होता :
    - (A) ॲक्विनास
    - (B) आन्सेल्म
    - (C) ऑगस्टीन
    - (D) ॲरिस्टॉटल

**ROUGH WORK**

**ROUGH WORK**